दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, मंगळवार, दि.१० जून २०२५
वर्ष : ०४, अंक : २९९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com




## मुंब्र्यात रेल्वे अपघात ! ५ जणांचा मृत्यू !!

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०९, मुंब्रा (ठाणे) :** दिवा ते मुंब्रा स्थानकादरम्यान धावत्या रेल्वेतून तब्बल १३ जण बाहेर पडली. यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला. फास्ट रेल्वे कसाऱ्याहून सीएसएमटीकडे येत होती. सकाळची वेळ असल्याने प्रचंड अशी गर्दी रेल्वेत होती आणि बाहेर लटकून लोक जात असताना ही घटना घडली. जखमी प्रवाशांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. ही घटना सकाळी साडेनऊच्या सुमारास घडलीये. या घटनेनंतर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. दोन गाड्या जात असताना ही धक्कादायक घटना घडलीये.

हा भीषण अपघात नेमका कसा घडला हे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे.



प्रत्यक्षदर्शी शिवा शेरवयी यांनी सांगितले की, दोन्ही साईटला रेल्वे होती, कोण पडले ते बघता आले नाही. जेव्हा रेल्वे इकडून गेली, त्यावेळी आरपीएफवाले उभे होते. त्यांनी बघितले आणि घटनास्थळी पोहोचले, लोक देखील मदत करण्यासाठी गेले. आरपीएफ अधिकाऱ्यांनी सांगितले की, तुम्ही रूळावर सर्वजण उतरू नका. फास्ट लोकल येत आहे.

ते पुढे म्हणाले की, त्यानंतर आरपीएफ टीम आली आणि त्यांनी एक एक करून बॉडींना उचलले. यामध्ये एक लेडीज देखील होत्या. त्या लेडीज जिवंत होत्या आणि त्यांना वाचवले जाऊ शकते, यासाठी त्यांना अगोदर बाहेर काढले. बाकी जे पडले होते, त्यांची अवस्था अशी नव्हती की, त्यांना वाचवले जाऊ शकते. एकच महिला पडलेली होती आणि बाकी सर्व पुरूष लोकलमधून पडल्याचे शिवा शेरवयी यांनी सांगितले.

दुसऱ्या एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, आम्ही मित्रासोबत होतो आणि कामासाठी जात होतो. मुंब्रा स्टेशननंतर ही अपघाताची घटना घडली. आमच्या डब्याच्यासमोरील डब्यातून एक माणूस उडून आला. त्यानंतर तीन लोक पडली. त्याने सांगितले की, आम्ही लोक भिंवडीला राहतो आणि कामासाठी नेरूळला जात होतो. आम्ही ज्या डब्यात बसलो होतो, त्यामधील लोक पडली आणि जे उभी होती त्यापैकी काहींना मार लागला. मलाही मार लागल्याचे सांगताना तो प्रत्यक्षदर्शी सांगताना दिसला आहे.

## मुंब्रा रेल्वे अपघाताबाबत रेल्वे प्रशासनाचा घोर निष्काळजीपणा : रोहिदास मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, ठाणे :** मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ आज सकाळी घडलेला भीषण अपघात हा केवळ दुर्घटना नसून, रेल्वे प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा थरारक पुरावा आहे. कसाऱ्याहून मुंबईकडे येणाऱ्या लोकल ट्रेनमधून पाच प्रवासी गाडीच्या दारातून खाली पडले आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

ही घटना थरकाप उडवणारी असली, तरी रेल्वे प्रशासनाच्या बाजूने अद्याप कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही, ही बाब धक्कादायक आहे. गर्दीमुळे प्रवासी दारात लटकून प्रवास करत होते. ही बाब नवीन नाही, मात्र उपाययोजना करण्याची जबाबदारी कुणाची?



**: मुंडे यांनी यावेळी पुढील मागण्या केल्या आहेत :**

या घटनेची उच्चस्तरीय चौकशी तात्काळ व्हावी, मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना किमान ₹२५ लाखांची नुकसानभरपाई द्यावी, दरवाजांमध्ये लटकणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात, दिवा ते मुंबई लोकल सेवा तात्काळ चालू करावी, लोकल गाड्यांचे फेऱ्या वाढवून गर्दी कमी करण्याचे धोरणात्मक पावले उचलावीत.

कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे (शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांनी या घटनेवर तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटलं आहे की, प्रवाशांचे जीव हे आकडे नसून कुटुंबाचे आधार आहेत. या निष्पाप प्रवाशांचा मृत्यू म्हणजे थेट रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा परिणाम आहे. या प्रकाराला जबाबदार असलेल्यांवर तत्काळ कारवाई झाली पाहिजे. सदर घटना ही केवळ अपघात नसून, ती व्यवस्थेतील दोषांचे भयावह दर्शन आहे. जेव्हा जनतेचा जीव धोक्यात येतो, तेव्हा तो केवळ दुर्दैवी अपघात म्हणून सोडवणूक करणं ही संवेदनाशून्यता आहे. रेल्वे प्रशासनाने आता तरी जागं व्हावं असे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

## वृद्ध महिलेचा खून ! संशयित दोन नातू अटकेत...

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.०९, हिमायतनगर :** तालुक्यातील टेंभुर्णी येथील एका ७५ वर्षीय महिलेचा आपल्याच राहत्या घरात दोन ते तीन दिवसापूर्वी तिला निर्गुण मारहाण करून तिच्या जवळील पैसे सोने नाणे घेऊन तिचा खून केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे ही घटना उघडकीस येण्यापूर्वी मोजे टेंभुर्णी येथे एकटी राहणाऱ्या महिलेच्या घरातून दुर्गंधी येत असल्याने गुरूवार तारीख दी ५ जून रोजी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान आढळून आले असता त्यांनी तात्काळ हिमायतनगर पोलीसांनी घटना सांगितली तेव्हा प्राथमिक माहितीवरून हिमायतनगर पोलीसात या घटनेची आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर महिलेचा घातपात झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे त्यावरून संसहित आरोपी म्हणून दिग्गी येथील त्या महिलेचे दोन नातू यांना हिमायतनगर पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील माहितीचा शोध घेत आहेत पण पोलिस तपासाअंती ही घटना खूणाची आहे हे स्पष्ट होणार आहे.




या बाबत सविस्तर वृत्त असे की, हिमायतनगर तालुक्यातील मौजे टेंभुर्णी येथील गयाबाई रामजी तवर ( देवसरकर) वय ७५ या महिलेच्या तिन्ही मुलीचे लग्न झाले असल्याने सदर महिला गावातील घरात एकटीच राहत होती. गुरूवारी सायंकाळी चार ते पाच वाजेच्या दरम्यान शेजारी राहणाऱ्या नागरिकांना घरातून दुर्गंधी येत असल्याने नागरीकांना संशय आल्याने गावातील नागरिकांनी हिमायतनगर पोलिसांना घटनेची माहिती दिली.

त्यानंतर पोलीसांनी घटना स्थळी भेट दिली असता सदरील महिलेच्या घराचा दरवाजा उघडला असता महिलेचा मृतदेह एका बाजेवर पांघरून ठेवलेला आढळून आला. सदर महिलेचा नैसर्गिक मृत्यू का खुन हे पोलिस तपासाअंती स्पष्ट होणार आहे. पण प्राथमिक दृष्ट्या हा एक क्रूरतेने केलेला खून असल्याचे घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी सांगितले पण पोलिसाचा तपास सुरू असल्याचे पोलिस निरीक्षक अमोल भगत यांनी सांगितले आहे .

या वयोवृद्ध महिलेची दुर्गंधी सूटल्याने घटनास्थळीच शवविच्छेदन करण्यात आले आहे हिमायतनगर पोलीसात शुक्रवार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असुन अधिक तपास पोलीस निरीक्षक भगत करीत आहेत पण या घटनेच्या तपासासाठी संशयित आरोपी म्हणून या महिलेचे दिघी येथील दोन नातू यांना पोलिसांनी अटक करून पुढील तपास ते करत असल्याचे समजले पण ही घटना कशामुळे घडली ही अद्याप कळले नाही.

## थोडक्यात

### निवडुंगेवाडी रस्त्याची दयनीय अवस्था

#### ग्रामसडक योजनेअंतर्गत येणाऱ्या रस्त्याची त्वरित दुरुस्तीची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर ते निवडुंगेवाडी दरम्यानचा तसेच नगर - कल्याण महामार्गाला जोडणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. या रस्त्यावर असलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे स्थानिक नागरिकांना, शाळा - कॉलेजातील विद्यार्थी, रुग्ण तसेच इतर प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. धुमाळ वस्ती ते निवडुंगेवाडी हा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंतर्गत येतो, मात्र प्रशासनाने या रस्त्याकडे अजूनही दुर्लक्ष केल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

टाकळी ढोकेश्वर गावापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या निवडुंगेवाडी परिसरातील नागरिक व आजूबाजूच्या गावातील प्रवाशी दररोज याच रस्त्याचा वापर करतात.

टाकळी ढोकेश्वरच्या ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना ने - आण करण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. दुचाकी व अन्य खाजगी वाहने याच मार्गाने ये-जा करत असताना त्यांना अनेक वेळा खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका निर्माण होतो. धुमाळ वस्ती पर्यंत जिल्हा परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की, रस्त्यावरील खड्डे हे अक्षरशः मृत्यूच्या सापळ्यासारखे वाटतात. विशेषतः रात्रीच्या वेळेस, रुग्णालयात जाणाऱ्या गरोदर महिलांना किंवा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना या रस्त्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, किरकोळ व्यापारी आणि सामान्य नागरिक याच मार्गाने प्रवास करतात. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये रोष निर्माण झाला आहे. धुमाळ वस्ती व निवडुंगेवडी येथील स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत आहे की, हा रस्ता प्रशासनाने त्वरित लक्ष घालून लवकरात लवकर दुरुस्त करून रस्ता व्यवस्थीत करावा असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

### मुंबई पुणे प्रवास अधिक सुखकर होणार...



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, मुंबई :** भारतातील सर्वात वर्दळीच्या महामार्गांपैकी एक असलेल्या महामार्ग म्हणजे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग. या महामार्गावरील वाढत्या वाहतुकीची गर्दी कमी करण्यासाठी,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे अपग्रेडेशन प्रस्तावित केले आहे. सध्याच्या सहापदरीवरून १० पदरी सुपर हायवे तयार करण्यात येणार आहे. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय महानगराला पुण्यासारख्या औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्राशी जोडणारा ९६ किलोमीटरचा हा महत्त्वाचा मार्ग आहे. वेगवान प्रवासासाठी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेचा वापर केला जातो. सध्या आठवड्याच्या दिवशी दररोज अंदाजे ६५,००० वाहने ये-जा करतात. शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वाहनांची संख्या १ लाखांपेक्षा जास्त असते. दरवर्षी वाहतुकीचे प्रमाण अंदाजे ५-६% वाढते. वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे एक्सप्रेसवेचा विस्तार करण्यात येणार आहे.

**भूसंपादनातील आव्हाने मर्यादीत...**

महत्त्वाचे म्हणजे, भूसंपादनातील आव्हाने कमीत कमी असण्याची अपेक्षा आहे. एमएसआरडीसीकडे आधीच विद्यमान एक्सप्रेसवेच्या बहुतेक भागांना लागून असलेली जमीन आहे. बोगद्याजवळ मर्यादित प्रमाणात अतिरिक्त जमीन देखील लागणार आहे.

दरम्यान १४,९०० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पात सध्याच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात येणार आहे. आर्थिक मॉडेलिंगचे काम सुरू आहे, परंतु जास्त खर्च असल्याने ते सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलद्वारे राबविले जाण्याची शक्यता आहे. नवी मुंबईतील कळंबोली येथून सुरू होणारा आणि पुण्याजवळील किवळे येथे संपणारा हा एक्सप्रेसवे हा भारतातील पहिला प्रवेश-नियंत्रित महामार्ग आहे. या एक्सप्रेस वेचे उद्घाटन २००२ मध्ये झाले होते.

## दिड वर्षांपासून सहा पंचायत समित्यांना बीडीओंची प्रतिक्षा ! पारनेर, संगमनेर, राहाता, कर्जत, नगरमध्ये प्रभारी राज !!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** राजकीयदृष्ट्या जागृत असणार्या अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या दीड ते दोन वर्षापासून सहा पंचायत समितीमध्ये प्रभारी राज आहे. या ठिकाणी गटविकास अधिकारी पद रिक्त आहे. रिक्त असणार्या या पदाचा पदभार सध्या प्रभारी अधिकार्यांच्या माथी मारण्यात आले आहे. विशेष म्हणजे अनेक महिन्यांपासून राहाता मतदारसंघात गटविकास अधिकारी प्रभारी आहे. प्रभारी राज असल्याने विकास कामांचा वेग मंदावला आहे.

सध्या संगमनेर, कोपरगाव, राहाता, पारनेर, कर्जत, नगर या सहा पंचायत समितीमध्ये नियमित गटविकास अधिकारी नसल्याने प्रभारी राज आहे. अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठा जिल्हा असून जिल्ह्यात १४ पंचायत समिती आहेत. या पंचायत समितीचा गाडा गटविकास अधिकारी यांच्या खांद्यावर आहे.

त्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीवर गेल्या तीन वर्षापासून अधिक काळापासून प्रशासकाची नियुक्ती आहे. प्रशासक असल्याने कामकाज करताना अधिकार्यांची चलती राहिली आहे. अशावेळी नियमित अधिकारी नसेल तर कामकाजात अडचणींना समोरे जावे लागत आहे.

या सहा पंचायत समितीवर गेल्या दीड ते दोन वर्षांपासून गटविकास अधिकारी हे पद रिक्त असल्याने या पदाचा कारभार ए बीडीओ यांच्यामार्फत सुरू असला तरी अतिरिक्त कारभारामुळे संबंधित ठिकाणच्या ए बीडीओ यांची डोकेदुखी वाढली आहे. तीन वर्षाहून अधिक काळ प्रशासक राज असून राज्य सरकार व केंद्र सरकारच्या सर्व योजना प्रशासक यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनापोटी दर महिन्याला कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होत असून तो खर्च करून संबंधित निधीचे नियोजन करण्याचे काम तालुका पातळीवर गटविकास अधिकारी यांच्यावर आहे. मात्र, जिल्ह्यातील १४ पैकी सहा ठिकाणी प्रभारी राज असल्याने जिल्हा परिषद प्रशासनाची देखील डोकेदुखी वाढलेली आहे.

पंचायत समितीमार्फत घरकुल योजना ते ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे, शालेय शिक्षण, आरोग्य, महिला बालकल्याण यासह जलसंधारणाचे कामे देखील करण्यात येतात. या सर्व कामांची देखरेख करण्याची तसेच मंजूर झालेला निधी खर्च करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांच्यावर आहे. मात्र,असे असताना संगमनेरचे गटविकास अधिकारी पद सहा महिन्यांपासून, राहाता आणि कोपरगावचे पद सात महिन्यांपासून तर पारनेर आणि कर्जतचे पद दिड वर्षापासून रिक्त आहे. रिक्त असणाऱ्या या पदावर मे महिन्याच्या अखेरीस नियुक्ती होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, अजूनही या पदावर नियमित गटविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली नाही. त्यामुळे प्रभारी अधिकारी आता वैतागले आहे. त्यांना मूळ पदाचे काम करून गटविकास अधिकारी पदाचे कामकाज करावे लागत आहे. ग्रामविकास विभागाने तातडीने या रिक्त पदावर नियुक्ती करावी अशी मागणी होत आहे.

# संपादकीय

## वटपौर्णिमा



हिंदू धर्मात वटपौर्णिमा हा सण महिला मोठ्या उत्साहाने साजरा करतात. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. आपल्या पतीला उत्तम आयुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी हे व्रत करण्यात येतं. यात वडाच्या वृक्षाची पूजा केली जाते.

या दिवशी स्त्रिया वटवृक्षाची पूजा करून मला व माझ्या पतिला आरोग्य संपन्न आयुष्य लाभू दे तसेच धनधान्य, मुले-बाळं, संसाराचा विस्तार होऊन भरभराटी येऊ दे, असे वटपौर्णिमेला गाऱ्हाणे घालतात.

वड हा वृक्ष दीर्घायुषी असल्याने वृक्षांचे संवर्धन आणि जतन व्हावे या हेतूने वृक्षाची पूजा करण्याची कल्पना भारतीय संस्कृतीने स्वीकारली आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे व्रत करायवयचे असते. तीन रात्र व्रत करावे असे सांगितले गेले आहेत. तरी तीन दिवस व्रत-उपवास करणे अशक्य असल्यास फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा.

या व्रताचा विधीत नदीकाठची वाळू आणून पात्रात भरुन तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाल्या जातात मग त्यांची षोडशोपचारे पूजा केली जाते. त्यानंतर पाच अर्धे घ्यावीत, मग सावित्रीची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी.

**वटपौर्णिमा व्रत पूजा साहित्य आणि विधी**

**वटपौर्णिमेच्या पूजेसाठी काही लागणारे साहित्य-**

हळद- कुंकू, सावित्री आणि सत्यवानाची मूर्ती, धूप, दीप, उदबत्ती, निरांजन, पाच प्रकारची फळं, फुले, दिवा ठेवण्यासाठी रोवळी, वडाला गुंडाळण्यासाठी पांढरा मोठा धागा, पाणी भरलेला लहान कलश,

पंचामृत, हिरव्या बांगड्या

**वटपौर्णिमेचा पूजा विधी**

सकाळची नित्यकर्म उरकल्यानंतर सुवासिंनीनी सौभाग्यलंकार परिधान करून देवाची प्रार्थना, तुळशी पूजन करून वडाच्या झाडाजवळ एकत्र व्हावं.

वटसावित्री व्रताचा संकल्प करावा.

षोडशोपचार पद्धतीने वडाची पूजा करावी.

बांबूच्या दोन टोपल्या घ्या, एका टोपल्यात सात प्रकारचे धान्य कापडाने झाकून ठेवा.

माता सावित्रीची मूर्ती दुसऱ्या टोपलीत ठेवावी आणि धूप, दिवा, अक्षत, कुमकुम, माऊली इत्यादी पूजेचे साहित्यही ठेवावे.

माता सावित्रीची पूजा केल्यानंतर वटवृक्षाला सात प्रदक्षिणा घालताना वटवृक्षाला माऊलीचा धागा बांधावा.

पंचामृत नेवैद्य म्हणून दाखवा.

यानंतर ब्राह्मण किंवा गरजू व्यक्तीला श्रद्धेनुसार दान-दक्षिणा द्यावी.

पूजेनंतर महिलां एकमेकींना आंब्याचे वाण देतात.

या दिवशी विवाहित महिलांनी वटवृक्षाची पूजा करून कथा ऐकावी.

सावित्री आणि सत्यवानाच्या नावाचा जप करावा.

**प्रार्थना...**

सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया ऋमला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

सावित्रि ब्रह्मसावित्रि सर्वदा प्रियभाषिणी।
तेन सत्येन मां पाहि दुःख-संसार-सागरात।
अवियोगो यथा देव सावित्र्या सहितस्य ते ।
अवियोगो तथास्माकं भूयात् जन्मनि जन्मनि ।।

वटमूले स्थितो ब्रह्मा वटमध्ये जनार्दनः। वटाग्रे तु शिवो देव: सावित्री वटसंश्रिता ।। अशीही प्रार्थना केली जाते.

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा

प्रविण बागडे
नागपूर, मो.९९२३६२०९१९



वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे.

वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, 'राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल'. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया 'मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

**सन् आहे सौभाग्याचा, बंध आहे अतूट नात्याचा ।**
**या शुभदिनी पूर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा ।।**
**वट पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!**

# जागतिक नेत्रदान दिन

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## मॉड पौर्णिमा..

वट पौर्णिमा आली
कुंडीत वडाचाफाटा
सिमेंटी जंगलामध्ये
शोधतो कृत्रिम वाटा

वडचित्राची हो पूजा
दगदगीस देई फाटा
वृक्ष संवर्धन करितो
दिखावा नको खोटा

उपवास अति कडक
पोटा काढला चिमटा
डायट होई अनायसे
आराममिळाला पोटा

तशीचं आहे संस्कृती
प्रवाह जरी हा उलटा
पतिपत्नी प्रेम तसेचं
अध्याय चाले सुलटा

पतिपत्नी सम समान
संसार सुखाने थाटा
सुख दुःख हसूं आसूं
दोघांचा समान वाटा

सातजन्म कोणजाणे
आनंद या जन्मी लुटा
संसार करा सोज्वळ
कशाला भांडणे तंटा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# वाचक पत्र




## वटपौर्णिमा आणि पर्यावरण रक्षण...

मंगळवारी वटपौर्णिमा आहे. आपल्या सौभाग्याच्या रक्षणार्थ या दिवशी महिला वटवृक्षाचे पूजन करतात. अनेक वसाहतींमध्ये, चाळींमध्ये, गावांमध्ये महिला आपल्या लहानग्यांसह एकत्रिपणे हा सण साजरा करतात. प्रतिवर्षी या दिवसांत पावसाने निसर्ग बहरून आलेला असतो आणि अशा नयनरम्य वातावरणात सगळ्यांनी एकत्रपणे उपवास करून वटवृक्षाची केलेली भावपूर्ण आराधना जगाला खूप महत्वाचा संदेश देऊन जाते. वटवृक्षाभोवती प्रदक्षिणा घालताना त्याच्याकडून पुष्कळ प्रमाणात प्रक्षेपित होणाऱ्या प्राणवायूचे ग्रहण करणे आणि या दिवशी उपवास करून सात्विक फराळाचे सेवन करणे या बाबी आपल्याला पावसाळ्यात आरोग्य कसे जपावे हे सांगते. उन्हाळ्यातील उकाड्यामुळे शरीराला आलेला थकवा या वेळच्या प्रसन्न वातावरणामुळे आणि भोवतालच्या स्त्रियांशी होणाऱ्या स्नेहमिलनामुळे कुठल्या कुठे निघून जातो. एकीकडे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभावामुळे आधुनिक युगातील पती-पत्नींमधील वाद, भांडणे, विवाहबाह्य संबंध, घटस्फोट यासारख्या गोष्टी अवतीभोवती पाहायला मिळतात तर दुसरीकडे आपली प्राचीन हिंदू संस्कृती वटपौर्णिमेसारख्या सणांच्या माध्यमातून पती-पत्नींना एकमेकांप्रती समर्पणाची भावना जपायला शिकवते. आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहण्याची शिकवण देणारा हा सण सध्याच्या काळात कुटुंबव्यवस्था आणि पर्यायाने समाजव्यवस्था उत्तम ठेवण्याचे महत्कार्य करतो. हल्ली बहुतांश वसाहतींमध्ये वटपौर्णिमेला वडपूजन करणे सोयीचे व्हावे यासाठी एक तरी वडाचे झाड लावले जाते. यानिमित्ताने पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्ष लागवडीचे आणि संगोपनाचे महत्व समाजमनावर रुजते. आपल्या भारतीय संस्कृतीचा हा समृद्ध वारसा सुज्ञपणे जपला आणि येणाऱ्या पिढीवरही तो प्रभावीपणे बिंबवला तर जागतिक तापमान वाढ, विस्कळीत होत चाललेली समाज व्यवस्था आणि अनारोग्य यांसारख्या समस्या सहजच सुटतील.

**- सौ.स्वाती हरेर, मुंबई**

## वटपौर्णिमा म्हणजे भारतीय परंपरेत स्त्रियांचे मानाचे स्थान अधोरेखित करणारा दिवस!

ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा ही वटपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. महिला अतिशय उत्साहाने हे व्रत साजरे करतात. यादिवशी वटपूजन करून त्या सावित्री आणि ब्रह्मदेवाकडे आपल्याला अखंड सौभाग्य लाभावे आणि धनधान्य आणि कुळाची वृध्दी व्हावी यासाठी प्रार्थना करतात.

यमराजाने सावित्रीचा पती सत्यवान याचे प्राण हरण केले आणि त्यानंतर तीन दिवस सावित्रीने यमधर्माशी वटवृक्षाखाली शास्त्र चर्चा केली. त्यात तिने तिच्या पतीचे प्राण पुन्हा देणे कसे शास्त्रसंमत आहे हे यमधर्माला पटवून दिले आणि यमराजाने



ते मान्य करून सत्यवानाला पुन्हा जिवंतही केले.

यावरून त्या काळातही स्त्रिया कशा शास्त्रांचे अध्ययन करणाऱ्या, सक्षम होत्या आणि त्यांच्या मताला प्रत्यक्ष देवादिकांमध्येही महत्त्व होते हे लक्षात येते. पती व पत्नीची एकमेकांच्या जीवनातील आवश्यकता, प्रेम आणि समर्पण अधोरेखित होते.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांचे कुटुंब आणि समाजातील स्थान हे मानाचे आणि सशक्त असे आहे. तिला जगतजननी म्हटले आहे आणि तिलाच दुष्टांचा संहार करणारी काली माताही म्हटले आहे हे लक्षात घेऊन आजच्या काळातही महिलांनी आपले हे सामर्थ्य आणि संस्कार टिकवून सामाजिक संतुलन राखण्यास तत्पर असले पाहिजे.

**- अनवी, कोल्हापूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# कलगीतुरा लोककलेची प्रतारणा करणाऱ्या शाहिरांवर होणार कारवाई

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०८, चिपळूण (रत्नागिरी) :** कलगीतुरा समाज उन्नती मंडळ समन्वय समितीची विशेष सभा रविवार, दिनांक ०८ जून २०२५ रोजी परशुराम (चिपळूण) येथे समितीचे अध्यक्ष अभयदादा सहस्त्रबुद्धे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. सभेला समन्वय समितीशी संलग्न मंडळाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. उपस्थितांतून सभेला अनुसरून सांगोपांग चर्चा करण्यात आली.

कलगीतुरा वैभवशाली परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रत्येक शाहिराने आपल्या पारंपरिक चौकटीला छेद न देता आपली कला सादर करून या लोककलेचा लौकिक अधिक वाढेल यादृष्टीने प्रयत्न करणे अभिप्रेत आहे. सभेदरम्यान कलगीतुरा समन्वय समिती व मंडळाची ध्येय धोरणे आपण तंतोतंत पाळू असा लिखित शब्द देऊनही काही शाहीर स्वतः च्याच वचनाला बांधील न राहता कलगीतुरा लोककलेच्या संस्कृतीशी प्रतारणा करताना निदर्शनास येत आहे. त्यांना वारंवार समज देऊनही अपेक्षित बदल दिसत नाही. त्यामुळे संबंधित शाहिरांवर कायम स्वरूपाची व ठोस कारवाई करण्यात यावी असा निर्णय समन्वय समितीच्या माध्यमातून घेण्यात आला.

कलगीतुरा लोककलेला शासन दरबारी न्याय मि ळावा यासाठी समन्वय समिती व संलग्न सर्व मंडळे तसेच संबंधित पदाधिकारी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. शासनाने आपल्या पदरात अपेक्षित अनुदान टाकावे. यासाठी शासनाला अभिप्रेत असणारी लोककला सादर करणे आवश्यक आहे.

**शक्ती-तुरा ऐवजी कलगीतुरा नामोउल्लेख करण्याचा सर्वानुमते निर्णय**

पर्यायाने त्यासाठी काही तांत्रिक बदल करण्याची देखील गरज असल्याचे सभे दरम्यान नमूद करण्यात आले. उदाहरणार्थ कलगीतुरा लोककलेचा उगम हा कलगी - तुरा या नावाने झाला आहे आणि त्यानुसार स्थापन झालेली आपली मंडळे ही कलगीतुरा समाज उन्नती मंडळ या नावानेच नोंदणीकृत आहेत.शासनाच्या निकषानुसार कलगीतुरा याच नावाने या लोककलेचा प्रचार आणि प्रसार होणे गरजेचे आहे. आजवर आपण शक्ती तुरा अशा आशयाने या लोककलेशी निगडीत जाहिरात करत आलो आहोत. परंतु यापुढे शक्ती तुरा ऐवजी कलगीतुरा असा नामोउल्लेख असणारी प्रचार फलक तयार करण्यात यावेत आणि तसाच उल्लेख आपल्या बोलण्यातून सुद्धा व्हावा अशी भूमिका आजच्या सभेत मांडण्यात आली आणि ती सर्वानुमते मान्य करण्यात आली. या लोककलेच्या समृद्धीसाठी आवश्यक ते चांगले बदल करण्यासाठी आपण प्रत्येक कलावंत सदैव बांधील आहोत आणि राहिले पाहिजे.

**कलगी तुरा शाहिरांनी येणाऱ्या हंगामात सोज्वळ आणि समाजप्रिय कार्यक्रम करण्याचे कलगीतुरा समन्वय समितीचे आवाहन**



सदर सभेमध्ये येणाऱ्या हंगामात सोज्वळ आणि समाजप्रिय कार्यक्रम सादर व्हावेत. शाहिरांनी आपल्या लोककलेची आणि स्वतः ची अस्मिता अबाधित ठेवून सादरीकरण करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. संबंधित मंडळांनी व घराण्यातील वरिष्ठांनी आपापल्या शाहिरांना सूचना द्याव्यात असे ही सुचवण्यात आले असल्याचे कलगीतुरा समन्वय समितीचे सचीव सुधाकर मास्कर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले. सदर सभेला समन्वय समितीचे विद्यमान अध्यक्ष अभयदादा सहस्त्रबुद्धे, सचिव सुधाकर मास्कर, उपाध्यक्ष चंद्रकांत गोताड, मोहन घडशी, मुंबई मंडळाचे अध्यक्ष अनंत तांबे आदी पदाधिकारी, देवरुख मंडळाचे अध्यक्ष शांताराम मालप आणि पदाधिकारी, चिपळूण मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग जंगम आणि पदाधिकारी तसेच लांजा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुंब्रा रेल्वे अपघातानंतर मध्य रेल्वेचा मोठा निर्णय

## मुंबईतील लोकल ट्रेनला ऑटोमॅटिक दरवाजे बसवणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, कळवा (ठाणे) :** मध्य रेल्वे रेल्वे मार्गावर मुंब्रा दिवा स्टेशन दरम्यान दिनांक ०९ जून २०२५ सकाळी एक मोठा अपघात झाला. लोकलमधून ८ प्रवासी रेल्वे ट्रॅकवर पडले. सकाळी साधारण पणे ९.३० वाजता मुंब्रा आणि दिवा दरम्यान ही दुर्दैवी दुर्घटना घडली. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर या अपघातानंतर आता मध्य रेल्वेने अत्यंत महत्वपूर्ण पाऊल उचलून खुप मोठा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील लोकल ट्रेनला आता बंद होणार दरवाजे बसवण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.दरम्यान याबाबत मध्ये रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील नीला म्हणाले की, सीएसएमटी ट्रॅक आणि कसारा ट्रॅकवरून दोन लोकल या ट्रॅकवर एकम ेकांना क्रॉस करत होत्या. दोन लोकल आजूबाजूला येताच प्रवासी एकमेकांना




धडकले आणि ट्रॅकवर पडले. प्रवासी ट्रॅकवर पडल्यानंतर स्थानिक लोकांनी त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रयत्न केले आले. यानंतर रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींवर सध्या कळवा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात दोन्ही गाड्या लोकल होत्या. दोन्ही लोकल ट्रकमधले अंतर दीड ते दोन मिटर असते. मात्र, प्रवाशांच्या बॅगा मागे होत्या, त्यामुळे धक्का लागल्याचे प्रवाशाचे म्हणणे आहे.

आता रेल्वेने उपाययोजना करण्यासंदर्भात नव्या लाईनचे नियोजन केले आहेत. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करण्यात येणार आहे. अशा प्रकारची ही पहिलीच घटना घडली आहे. ज्यात दोन्ही बाजूनं लोकल जात असताना फूटओव्हरवर लोकं उभे असताना पडले. अपघातस्थळी सीसीटीव्ही होते की नाही? लोकलमध्ये गर्दी किती होती? यासंदर्भात माहिती घेतली जाईल. याबाबत चौकशी केली जाईल. काही जणांमध्ये लोकलमध्ये भांडणं सुरु होते, अशी देखील माहिती समोर येत आहे. याबाबत आम्ही तपास करत असल्याची माहिती सीपीआरओ यांनी दिली आहे.

**लोकल ट्रेनला ऑटोमॅटिक बंद होणारे दरवाजे बसवणार**

तर रेल्वे बोर्डाने निर्णय घेतला आहे की मुंबई उपनगरीय रेल्वेअंतर्गत तयार होणाऱ्या प्रत्येक कोचमध्ये ऑटोमॅटिक दरवाजे बसवले जातील. याशिवाय सध्या वापरात असलेल्या मुंबई उपनगरीय लोकलच्या डब्यांचे पुनर्रचना (रीडिझाईनिंग) करण्यात येणार आहे आणि त्यामध्ये देखील ऑटोमॅटिक दरवाजे बंद होण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती मध्ये रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील नीला यांनी दिली आहे. तर सुरुवातीला पुष्पक एक्स्प्रेसमधून हे प्रवासी पडल्याची माहिती समोर आली होती. मात्र या अपघाताशी पुष्पक एक्स्प्रेसचा संबंध नसल्याची माहिती स्वप्नील नीला यांनी दिली आहे.

# कृषी पंपाकरीता विशेष बाब म्हणून विज जोडणी द्या - आ.मुनगंटीवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाची समस्या मोठी असून यादृष्टीने उपाययोजना म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाकरीता विशेष बाब म्हणून विज जोडणी उपलब्ध करुन देण्यात यावी. अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाला विद्युत जोडणी मिळण्याम ध्ये येत असलेल्या अडचणी संदर्भात



भाजपा किसान मोर्चा चंद्रपूर जिल्हाध्यक्ष बंडू मधुकर गौरकर यांनी आ.सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देऊन समस्या मांडली होती. त्या अनुषंगाने आ.म ुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समस्या अवगत करीत मागणी केली आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील कृषी पंपाला विद्युत जोडणी मिळण्याकरिता आवेदन केले असून डिमांडचा भरणा केलेला आहे. परंतु त्यांना अजुनपर्यंत विद्युत जोडणी करुन मिळालेली नाही. 'बळीराजा कृषी विज माफी योजना' लागू झाल्यापासून शेतकऱ्यांना कृषी पंप विद्युत जोडणी देणे बंद करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जम ीनीची पाण्याची पातळी १५० फुटापर्यंत आहे. त्यामुळे सौरपंप उपयोगी पडणार नसल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून कृषी विज जोडणी करुन देण्याची विनंती निवेदनामार्फत केली आहे. त्याअनुषंगाने याबाबत योग्य कार्यवाहीसाठी संबंधिताना आदेश द्यावेत, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचेकडे केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी भरलेल्या डिमांड बाबत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आ.सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी केली आहे.

# थोडक्यात

## जाधवर इन्स्टिटयूटस्तर्फे ६ व्या कीर्तन महोत्सवात कीर्तन महर्षी पुरस्कार प्रदान

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०९, खडकवासला (पुणे) :** आपण कितीही मोठे झालो तरी आपली मात्रभूमी, आई-वडील, ग्रंथ, पंथ, संप्रदायाचा विसर पडू देऊ नये. संत वाययाची कास ज्यांनी धरली, त्यांच्या जीवनात कधीही कम



तरता पडत नाही. आज अभ्यासक वाढले पण उपासना पद्धती नष्ट होत चालली आहे. आपले समग्र वायय अन्य भाषेत भाषान्तरित होणे गरजेचे आहे. असे ह.भ.प.अमृताश्रम महाराज स्वामी जोशी यांनी सांगितले. न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे सहाव्या कीर्तन महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या प्रांगणात करण्यात आले. त्यामध्ये यंदाचा कीर्तन महर्षी पुरस्कार ह.भ.प. अमृताश्रम महाराज स्वामी जोशी यांना तर, मृदूंगभीष्म पुरस्कार मृदूंगाचार्य अप्पा महाराज दातार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी उपस्थित होते. अमृताश्रम महाराज म्हणाले, सामाजिक कार्य ही ईश्वर सेवाचआहे. ती संधी ठराविक जणांना मिळते. अंतःकरण, शास्त्र आणि गुरुकृपा या तीन कृपा महत्वाच्या आहेत. वैदिक व सनातनी विचार आत्मसात करायला बाहेरच्या लोकांना अडचण येते. त्यामुळे विविध प्रकारच्या भाषा आपल्याला देखील यायला हव्या. शालेय विद्यार्थी, तरुणाई, पालक व नागरिकांना कीर्तनाद्वारे प्रबोधनाकरीता कीर्तन महोत्सव घेण्यात आला. त्यामध्ये ह.भ.प. सुनील महाराज निवंगुणे, ह.भ.प. अमृताश्रम महाराज स्वामी जोशी, ह.भ.प. संतोष महाराज पायगुडे यांचघे कीर्तन आणि महोत्सवाचा समारोप शिवशंभु व्याख्याते, भागवत कथाकार ह.भ.प.गुरुवर्य राजेंद्र महाराज येप्रे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. ह.भ.प.येप्रे महाराज साधक वर्ग आणि समस्त ग्रामस्थ न-हेगाव यांनी संयोजनात सहभाग घेतला आहे. शिक्षणमहर्षी प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटटस्च्या वतीने या सहाव्या कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

## एस.टी स्टँड चौकातील झाडे नागरिकांना देत आहेत उन्हापासून सावली

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.०९, पेठवडगाव (कोल्हापूर) :** पेठ वडगाव येथे चौकात सुमारे ७५ वर्षापासून असलेल्या झाडांची सावली नागरिकांना उन्हाच्या चटक्यापासून दिलासा देत आहे. या झाडामुळे या परिसरात गारवा निर्माण होत आहे. गर्द सावलीमुळे मोटर सायकलस्वार या ठिकाणी वाहन पार्किंग मोठ्या प्रमाणात करत आहेत. सुमारे ७५ वर्षापासून हे झाडे या ठिकाणी आहेत. रस्ते रुंदीकरणात हे शासनाने हे झाडे जतन केली आहेत. या झाडांच्या सावलीत दिवसभर असं नागरिक क्षणभर विसावा घेत असल्याचे चित्र आहे. दरम्यान काही नागरिकांनी झाडे काढून टाकावेत असा अर्ज दिला आहे. या घटनेने निसर्गप्रेमी व नागरीकातून आश्चर्य व संताप व्यक्त होत आहे. पालिका प्रशासनाने या झाडांची काळजी घ्यावी. अशी मागणी शहरवासी यातून व्यक्त होत आहे.

## खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् चिंचोलीमाळी सबस्टेशनला मिळाले रोहित्र सबस्टेशनला मिळाले ५ एमव्हीए क्षमेचे ट्रान्सफार्मर



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०९, केज (बीड) :** चिंचोली माळी येथील सबस्टेशन येथे ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून आल्यानंतर खासदार बजरंग सोनवणे यांनी म हावितरण विभागाचे मुख्यअंभियता लातूर यांना पत्र लिहले होते. यानंतर दिनांक ०९ जून २०२५ रोजी याठिकाणी रोहित्र मिळाले असून याबाबत ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.चिंचोली माळी येथे महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र, कमी क्षमतेच रोहित्र याठिकाणी असल्याने अनेकदा अडचणीचे ठरत होते. सदरील ठिकाणी ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मिळवून देण्यात यावे, अशी ग्रामस्थ आणि परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. दरम्यान, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरणचे मुख्य अभियंता यांना पत्र देऊन सदरील काम मार्गी लावावे, असे म्हटले होते. यानंतर ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर रोहित्रचे काम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या देण्यात यावा. अशा सुचना ही देण्यात आल्या होत्या. सदरील कामाची प्रशासकीय मान्यता आल्यानंतर परवानग्यांचा विषय समोर आला होता. यात ही खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यानंतर दिनांक ०९ जून २०२५ रोजी रोहित्र बसविण्यात आले. आता रोहित्र बसविल्याने उच्च दाबाने विद्युत पुरवठा होणार आहे. शिवाय शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, खा.सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात लक्ष घालून बारकाईने पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# अक्षर चळवळीतून नव समाज निर्मिती शक्य होईल - प्राचार्य गिरासे

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०९, धाराशिव :** माहिती तंत्रज्ञान झपाट्याने वाढत असल्यामुळे सांस्कृतिक संकल्पना प्रचंड गतीने बदलत आहे. या बदलामुळे भारतीय संस्कृतीची मूल्य मोडीत निघत असून नवसमाज मूल्ये बाळसे धरायला लागली आहेत. भारतीय संस्कृतीचा कणा म्हणून कुटुंब व्यवस्थेकडे पाहिले जाते.

कुटुंब व्यवस्था मोडीत निघण्याच्या या काळात युवकांच्या समृद्ध लेखनातून अक्षर चळवळीतून नव समाज निर्मिती शक्य होईल; असे मत अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती देवगिरी प्रांत अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर संजय गिरासे यांनी व्यक्त केले. धाराशिव येथील कलाविष्कार अकादमी, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था व अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कथा स्पर्धेतील विजयी स्पर्धक साहित्यिक, गुणवंत साहित्यिक शिक्षक, इयत्ता दहावी - बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी यांच्या अभिनंदन सोहळ्यात अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. कलाविष्कार अकादमीचे मल्हारी माने, ॲड विद्युल्लता दलभंजन, नितीन बनसोडे, डी जी कुलकर्णी, महेश उंबरगीकर,



वर्षा नळे समूहाच्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, साहित्य भारती प्रदेश कार्यकारिणीचे उपाध्यक्ष डॉक्टर रविंद्र बेंबरे, रा.प. महाविद्यालयाचे प्राचार्य जयसिंगराव देशमुख यांनीही समयोचित उद्बोधक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलाविष्कार अकादमी, बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष तथा अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांनी करताना गुणवंतांचा सत्कार करुन सार्वजनिक रित्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे हे सकस समाज निर्मितीसाठी आवश्यक असते व गेल्या सतरा वर्षांपासून हा उपक्रम आपण करत आहोत असे मत व्यक्त केले. यावेळी मंचावर ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे, शिक्षण विस्तार अधिकारी मल्हारी माने, साहित्य भारतीचे कार्यवाह रविंद्र शिंदे, बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यवाह सम ाधान शिकेतोड, प्राचार्य प्रशांत चौधरी, शंकरराव नळे यांची प्रमुख उपस्थिती होती. हनुमंत पडवळ, कृष्णा साळुंके, युसुफ सय्यद, अविनाश मुंढे, पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन मराठी भाषा समितीचे जिल्हा सदस्य भैरवनाथ कानडे यांनी केले, तर हनुमंत पडवळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगाता कलाविष्कार चे मुकुंद पाटील यांच्या पसायदानाने झाली.